अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार, दि. ८ जुलै २०२३ | ▶ वर्ष : २१ वे ▶ अंक : २७९ वा किंमत : ५ रुपये ▶ पाने ८

## कमी उंचीच्या गणेश मूर्तींसाठी शाडू माती बंधनकारक



✔ सुराज्य/मुंबई

अवघा काही महिन्यांचा अवधी असताना गणेश भक्तांसाठी दिलासा देणारी बातमी आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून 'प्लॅस्टर ऑफ पॅरिस'ला पर्याय सुचवण्याबाबत गाईडलाइन अद्याप जाहीर झाल्या नसल्याने यंदा पीओपीच्या गणेश मूर्तींना परवानगी देण्यात आली आहे. मात्र कमी उंचीच्या मूर्तींसाठी शाडू माती बंधनकारक करण्यात आली आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून 'प्लॅस्टर ऑफ पॅरिस'ला पर्याय सुचवण्याबाबत गाईडलाइन जारी करण्यात येणार होत्या. मात्र मंडळाने अद्यापही गाईड्लाइन जाहीर झाली नसल्याने मुंबईतील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना या वर्षी पीओपीच्या चार फुटांवरील गणेशमूर्ती वापरता येणार आहे.

मात्र चार फुटांपेक्षा कमी उंचीच्या मूर्तींसाठी शाडूची माती बंधनकारक असणार आहे. दरम्यान, गणेशोत्सवाला अवघे तीन महिने शिल्लक आहेत.

# वारे फिरले

# बहीण-भावाचे वैर अखेर संपले

# पंकजांनी औक्षण केले, धनंजय यांनी कवेत घेतले

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**बीडच्या राजकारणात शुक्रवारी राजकीय वाऱ्याची दिशा अचानक फिरली. हे वारे तसे आनंदाचेच होते. बहीण-भावांनी दहा वर्षांचे राजकीय वैर संपुष्टात आणून शुक्रवारी एकमेकांची गळाभेट घेतली. आपला भाऊ मंत्री झाल्याच्या आनंदात भाजपा नेत्या पंकजा मुंडे यांनी धनंजय यांच्या घरी जावून चांदीच्या ताटातून त्यांना औक्षण केले तर धनंजय यांनी आपली बहीण घरी आल्याच्या उल्हासात पंकजा यांना पेढा भरवून आपल्या कवेत घेतले. त्यावेळी दोघेही अत्यंत भावूक झाले. दोघांनी राजकीय हाडवैर संपुष्टात आणले. बहीण-भावाच्या या दिलजमाईने भाजपाच्या गोटात खळबळ माजली आहे. पंकजा या कदाचित वेगळी वाट धरू शकतात, असे भाकित वर्तवले गेले आहे. त्यामुळे बीडमधील राजकीय कलाटणीची माहिती समोर येताच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंकजा यांच्याबाबतीत नरमाईची भूमिका घेतल्याचेही पहायला मिळाले.**

धनंजय यांची वर्णी कॅबिनेटमध्ये लागली. त्यामुळे गेली अनेक वर्ष विळा-भोपळ्याचे नाते असलेले धनंजय आणि पंकजा एकाप्रकारे सत्तेतील वाटेकरु झाले. या भेटीप्रित्यर्थ खुद्द धनंजय यांनीच ट्विटरवर एक व्हिडीओ शेअर केला आहे. त्यात ते म्हणतात की, राज्याच्या मंत्रीपदी नियुक्ती झाल्यानंतर माझ्या भगिनी तथा भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताईने माझे औक्षण केले व शुभेच्छा दिल्या. भाजपची राष्ट्रीय सचिव म्हणून मींही ताईचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. आनंदाचा डोह असो किंवा दुःखाचा सागर, बहीण-भावाचे नाते कायमच अबाधित आहे. हे भावनिक विधान पाहाता वर्षानुवर्षांच्या वादावर मुंडे भावंडांनी पडदा टाकल्याचे चित्र आहे.

भाजपाचे दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांच्या राजकीय वारसदार असलेल्या पंकजा मुंडे राज्यातील प्रमुख ओबीसी नेत्यांपैकी एक आहेत. मराठवाड्यातील अनेक विधानसभा मतदारसंघांवर त्यांचा प्रभाव आहे.

मात्र, तरीही पक्षाने त्यांना बराच काळ जबाबदारीच्या पदापासून किंवा मंत्रीपदापासून दूर ठेवले आहे. काही दिवसांपूर्वीच धनंजय हे अजित पवार यांच्यासह शिंदे-फडणवीस सरकारमध्ये सामील झाले. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत परळी मतदारसंघातून भाजप पंकजा यांना उमेदवारी मिळेल की नाही, याबाबत साशंकता आहे.

या सगळ्या अनिश्चिततेमुळे पंकजा या भाजपला सोडचिठ्ठी देऊन वेगळी वाट धरणार का, याची उत्सुकता राज्याला लागली आहे. २०१९च्या निवडणुकीत पंकजा यांचा पराभव झाला तर धनंजय हे विजयी झाले.

### पंकजा मुंडे काय म्हणाल्या?

पंकजा म्हणाल्या की, राजकारणात ज्या विचारसरणीला ठेवून मी आले, त्याच्याशी मला जेव्हा प्रतारणा करावी लागेल, चुकीच्या तडजोडी कराव्या लागतील, तेव्हा राजकारणातून बाहेर पडायलाही मागेपुढे पाहणार नाही. आत्ताच्या परिस्थितीत मला एका विश्रांतीची गरज आहे. पाठीत खंजिर खुपसण्याचे संस्कार माझ्या रक्तात नाहीत. २० वर्षांपासून भाजपमध्ये काम करत आहे. भाजप सोडून मी कुठेही जाणार नाही.





### अंतःकरणाला लाज नसते...

अंतःकरणाला लाज नसते, असे एक मराठीत सुभाषित आहे.त्याचा प्रत्यंतर शुक्रवारी आला. आमच्यात आता बहीण भावाचे नाते राहिलेले नाही. आम्ही आता राजकीय वैरी आहोत. राजकारणातून नात्यात वैर निर्माण झाल्याचे धनंजय मुंडे यांनी एकदा म्हटले होते. धनंजय मुंडे यांनी नात्यातल्या दुराव्याबद्दल भाष्य करुन बहीण भावाच्या नात्यात दरी निर्माण झाल्याची कबुलीच दिली. पण धनंजय मुंडे यांनी जरी नातं संपलं म्हटलेलं असलं तरी पंकजा यांनी मात्र समजूतदारपणाची भूमिका घेत, 'असं कुणी म्हटल्याने नातं संपत नसतं अन् राहिला वैर भावनेचा विषय तर माझा कुणीही वैरी नाही', असे एकदा म्हटले होते.नात्यात अंतःकरणाला लाज नसते,असे म्हटले जाते, असे पंकजा यांनी म्हटलं आहे.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

✔ **सोलापूर** : अज्ञात वाहनाच्या धडकेत जखमी झालेल्या दुचाकीस्वाराचा उपचारादरम्यान शासकीय रुग्णालयात गुरुवारी सायंकाळी मृत्यू झाला. सिद्धेश्वर किसन टिळे (वय २४, रा. चिंचकोट, ता. उमरगा ) असे त्या मयत दुचाकीस्वाराचे नाव आहे. तो मोटरसायकल वरून चिंचकोट ते बसवकल्याण असे निघालेला असताना मंठाळमोड जवळ समोरून अज्ञात वाहनाने त्याला धडक दिल्याने डोक्याला व पायाला मार लागून तो गंभीर जखमी झाला होता. त्यास येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता त्याचा उपचारादरम्यान गुरुवारी सायंकाळी मृत्यू झाला. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.

## अवेक्षक खानापुरे यांच्यावर आयुक्तांनी केली निलंबनाची कारवाई

### बांधकाम परवानग्या देण्याची समांतर बेकायदेशीर व्यवस्था केल्याप्रकरणी

✔ सुराज्य/सोलापूर

नगररचना विभागाकडे कार्यरत नसताना, बांधकाम परवान्याबाबतचे कोणतेही कामकाज हाताळण्याचे अधिकार नसताना बिपीएमएस प्रणालीद्वारे प्रकरणे निकाली काढण्याची यंत्रणा कार्यान्वीत असतानासुध्दा तिचा अवलंब न करता ऑफलाईन पद्धतीने बांधकाम परवानगी दिल्या तसेच नगर रचना विभागाला डावलून बांधकाम परवानग्या देण्याची समांतर बेकायदेशीर व्यवस्था निर्माण केल्याप्रकरणी अवेक्षक श्रीकांत खानापूरे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. तसे आदेश महापालिका आयुक्त शितल तेली उगले यांनी आज काढले आहेत. यामुळे महापालिका वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

महापालिका आयुक्तांनी काढलेल्या निलंबन आदेशात म्हटले आहे की, अवेक्षक श्रीकांत खानापूरे हे नगर रचना विभागाच्या बांधकाम परवाना विभागाकडे कार्यरत नसताना बांधकाम परवाना देणे, नियमाचे उल्लंघन करणे, ऑनलाईन पद्धतीने कामकाज चालू असताना, ऑफलाईन पद्धतीने बांधकाम परवानगी देणे असे अनेक मुद्दे उपस्थित करून तसेच ज्यांना बांधकाम परवाना देण्यात आलेला आहे, त्यांची नावे नमुद करून तुकाराम राठोड यांनी दि. १९ एप्रिल रोजी तक्रार अर्ज केला होता. राठोड यांनी माहिती अधिकाराअंतर्गत चार बांधकाम परवानगीचे कागदपत्रे मिळण्याबाबत अर्ज केला होता. त्यानुसार कागदपत्रे देणेकामी बांधकाम विभागाकडील अभिलेख्यात चार फाईलचा शोध घेतला असता, कार्यालयात नस्ती सापडल्या नाहीत. कार्यालयात नस्ती उपलब्ध न झाल्याने संबंधीत बांधकाम धारकांकडे याबाबत चौकशी केली असता, चार पैकी दोन प्रकरणातील बांधकाम परवाना प्रमाणपत्र व नकाशा उपलब्ध झाले. त्यापैकी एका नकाशावर श्रीकांत खानापूरे यांची स्वाक्षरी दिसून आली आहे. यास्तव संबंधित बांधकाम धारकाला त्यांच्या जागेची सर्व कागदपत्रे, बांधकाम परवानगी, मंजुर नकाशे देण्याबाबत व सुरू असलेले बांधकाम त्वरीत थांबविणेबाबत पत्र देण्यात आले.तेव्हा त्यापैकी बरीच पत्रे पत्ता अपूर्ण असल्याने परत आली.

बांधकाम परवानगीची एक प्रत कर आकारणी विभागास देण्यात येत असते ती प्रत उपलब्ध करून घेण्यासाठी मालमत्ता कर विभागाकडे पत्र व्यवहार केला असता सदर विभागाकडेही बांधकाम परवानगीची प्रत पाठविली नसल्याचे निदर्शनास आले. त्याबाबतची कोणतीही कागदपत्रे नगर रचना विभागाच्या अभिलेख्यात व अन्य कार्यालयाकडेही उपलब्ध होऊ शकलेली नाहीत. तक्रारीत तत्थ्य असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. नगर रचना विभागाला डावलून बांधकाम परवानग्या देण्याची समांतर बेकायदेशीर व्यवस्था श्रीकांत खानापूरे यांनी निर्माण केल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट होते.

अवेक्षक खानापुरे यांच्या गैरवर्तनासाठी अधिक चौकशी करणे गरजेचे आहे. या चौकशीस बाधा येऊ नये म्हणून श्रीकांत खानापूरे यांना निलंबनाधिन ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे खानापुरे यांना दिनांक ५ जुलै २०२३ रोजी कार्यालयीन वेळेनंतर सेवेतून निलंबित करण्यात येत असल्याचे महापालिका आयुक्तांनी आदेशात म्हटले आहे.

## राज-उद्धव यांनी एकत्र यावे ही बाळासाहेबांची शेवटची इच्छा

### गडकरी यांचा गौप्यस्फोट

✔ सुराज्य/मुंबई

मुंबईत अनेक ठिकाणी दोन्ही ठाकरे बंधुंनी एकत्र येण्याचे आवाहन करणारे बॅनर झळकत आहेत. यातच आता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी एक मोठा दावा केला आहे. गडकरी यांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची शेवटची इच्छा बोलून अपूर्ण राहिल्याचे सांगितले.



झी मराठीवर अवधुत गुप्ते 'खुपते तिथे गुप्ते' शो घेऊन आले आहेत. या शोमध्ये नितीन गडकरी यांनी हजेरी लावली. येत्या ९ तारखेला हा भाग रिलीज होणार आहे. या भागाचे काही प्रोमो समोर येत आहेत, अशाच एका प्रोमोमध्ये गडकरी यांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची शेवटची इच्छा बोलून अपूर्ण राहिल्याचे सांगितले.

यावेळी नितीन गडकरी म्हणाले की, बाळासाहेबांचे माझ्यावर आणि माझे बाळासाहेबांवर खूप प्रेम होते. बाळासाहेब त्यांच्या अखेरच्या दिवसांत होते, तेव्हा मी त्यांना भेटायला गेले होतो. त्यावेळेस त्यांनी सर्वांना बाहेर जायलं सांगितलं आणि मला एकट्यात शेवटची इच्छा बोलून दाखवली. त्यांनी मला राज आणि उद्दव यांना एकत्र करण्यास सांगितले. राजकारण एका बाजुला, पण एक कुटुंब म्हणून एकत्र असल्यावर ताकत वाढत असते. बाळासाहेबांची ती इच्छा अद्याप अपूर्ण राहिली आहे, असा गौप्यस्फोट गडकरींनी केला.

याच कार्यक्रमात नितीन गडकरींनी राज्यातील परिस्थितीवरही भाष्य केले आहे. ते म्हणाले, महाराष्ट्रातील राजकीय परंपरा ही खरेतर देशातील राजकारणापेक्षा वेगळी आहे. त्याकाळी कठोर टीका करायचो पण व्यक्तिगत मैत्री होती. थोडेसे आता जास्त झाल्यासारखे वाटते. याला खरे कारण नेत्यांपेक्षा मीडियाच कारणीभूत आहे.

## स्टूलवरून पडून वृद्धेचा मृत्यू

✔ **सोलापूर** : घरामध्ये स्टूलवरून पडलेल्या वयोवृद्ध महिलेचा उपचारादरम्यान छत्रपती शिवाजी महाराज शासकीय रुग्णालयात शुक्रवारी पहाटे मृत्यू झाला. रुबाबी शेकलाल मुलानी ( वय ७५, रा. आंधळगाव, ता. मंगळवेढा ) असे त्या मयत महिलेचे नाव आहे.त्या घरात साफसफाई करीत असताना स्टुल वरून खाली पडल्या. यात डोक्याला मार लागल्याने प्रथमोपचार करून शासकीय रुग्णालयात मुलगा मेहबूब मुलानी यांनी रात्री दाखल केले असता त्यांचा उपचारादरम्यान शुक्रवारी पहाटे मृत्यू झाला. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.

## श्री विठ्ठल रुक्मिणीची प्रक्षाळ पूजा संपन्न

✔ सुराज्य/पंढरपूर

तब्बल तीन आठवड्यापासून आषाढी यात्रेला आलेल्या लाखो वारकऱ्यांना दर्शन देण्यासाठी चोवीस तास उभ्या असणाऱ्या श्री विठ्ठल रूक्मिणीचे नित्योपचार शुक्रवारी प्रक्षाळपूजे नंतर पुन्हा सुरू झाले. या निमित्त मंदिरास आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती तर देवांस दागिने परिधान करण्यात आले होते.



विठुराया आपल्या भक्तांसाठी पंढरीत अवतरला असल्याची अख्यायिका आहे. यामुळेच आषाढी व कार्तिकीसारख्या महत्वाच्या यात्रेमध्ये आपल्या लाडक्या वारकऱ्यांना दर्शन देण्यासाठी देव चोवीस तास उभे असतात असे मानले जाते. यात्रा काळात देवाचा पलंग काढला जातो व सर्व नित्योपचार बंद ठेवले जातात. यात्रे नंतर प्रक्षाळपूजा करून सदर नित्योपचार सुरू केले जातात. तसेच थकलेल्या देवाचा शिणवटा देखील काढला जातो.

दरम्यान परंपरे प्रमाणे प्रक्षाळपूजे निमित्त दुपारी बारा वाजता श्री विठ्ठलास गरम पाण्याचे पहिले स्नान घालण्यात आले. तर दुपारी दोन वाजता श्री विठ्ठल व रूक्मिणीस दुधाचा अभिषेक करण्यात आला. तब्बल दोन तास ब्रह्मवृंदाच्या मंत्र घोषात हा विधी सुरू होता. मंदिर समितीचे सदस्य संभाजी शिंदे, सदस्या शकुंतला नडगिरे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक बालाजी पुदलवाड यांनी सहकुटुंब देवाची पूजा केली. यानंतर देवाला अत्यंत दागिने परिधान करण्यात आले होते. तर रात्री थकलेल्या देवाला विविध २१ वनस्पती औषधीपासून बनविलेला आयुर्वेदीक काढा देखील दाखविण्यात आला. तत्पूर्वी शुक्रवारी सकाळ पासून देवाच्या चरणाला लिंबू व पिठी साखर लावण्यासाठी भाविकांनी गर्दी केली होती. यात्रेत देव चोवीस तास उभे असल्याने थकलेल्या देवांच्या चरणाला स्थानिकांसह भाविक लिंबू व पिठी साखर लावतात. मात्र मूर्तीची झीज होऊ नये म्हणून मागील अनेक वर्षा पासून देवाच्या चरणांवर चांदीचे कवच ठेवले जाते.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



निदान 'खुर्ची तरी वाचावी' असा त्यांचा हेतू दिसतोय!

कल्याण
568-95-230


मुंबई
334-05-357

## शौचालयाचे प्रस्ताव सादर न करणाऱ्या ग्रामसेवकांवर निलंबनाची कारवाई : स्वामी

✔ सुराज्य/सोलापूर

ग्रामसेवकांनी येत्या सोमवारपर्यंत शौचालयाचे परिपूर्ण प्रस्ताव सादर न केल्यास त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात येईल तसेच पंचायत समिती स्तरावरील गट विकास अधिकाऱ्यांनीही जबाबदार धरून त्यांचे एक महिन्याचे वेतन थांबविले, जाईल असा इशारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी दिला आहे .







शुक्रवारी स्थायी समितीची बैठक झाली .त्या बैठकीत या सूचना देण्यात आल्या. जिल्हा परिषदेच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात शौचालय बांधण्याचे काम ग्रामीण भागातील लाभार्थ्यांनी केले आहे. त्यातील अनेक लाभार्थ्यांना शौचालयाचे अनुदान केवळ कामचुकार ग्रामसेवकांच्या चुकीमुळे मिळाले नाही.

ग्रामसेवकांकडून समाधानकारक काम न झाल्यामुळे जिल्ह्यातील २२ ग्रामसेवकांना सूचना दिल्या आहेत. वैयक्तिक शौचालयामध्ये अनुदान वितरित झाले नाही. जिल्ह्यामध्ये १३५० लाभार्थी आहेत. त्यांचे परिपूर्ण प्रस्ताव ग्रामसेवकांनी पंचायत समिती स्तरावर सादर केले नाहीत. दहा-पंधरा दिवसापासून पाठपुरावा करत राहिल्याने केवळ ३५० प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत . बाकीचे प्रस्ताव घेण्यासाठी जिल्ह्यात विविध ठिकाणी पडताळणी अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे .त्यांच्याकडून सोमवारपर्यंत संपूर्ण उर्वरित १००० प्रस्ताव उपलब्ध होणे आवश्यक आहे.

### गटविकास अधिकाऱ्यांवरही कारवाई करणार

सोमवारपर्यंत प्रस्ताव जमा न केल्यास २२ ग्राम सेवकांवर निलंबनाचे कारवाई करण्यात येईल, असा इशारा दिलीप स्वामी यांनी दिला आहे. तसेच तालुका गटविकास अधिकाऱ्यांनाही जबाबदार धरून त्यांच्यावरही कारवाई म्हणून एक महिन्याचे वेतन थांबविण्यात येणार आहे असे असेही स्वामी यावेळी सांगितले.